ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २७ जुलै, १९६० | अंक २९

## विविध माहिती

**कच्च्या मालाचा अपुरा पुरवठा**—मध्यवर्ती सरकारच्या नौकरांच्या संपामुळें इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनीच्या बर्नपूर व कुल्टी येथील पोलादाच्या कारखान्यांना कच्च्या मालाचा पुरवठा अपुरा होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. कोळसा व चुनखडी कमी पडूं लागल्यास कारखान्यांतील कांहीं विभाग तात्पुरते बंद करण्यांत येतील.

**महागाईवर तोडगा**—मध्यवर्ती नौकरांच्या संपाविषयीं बोलतांना आचार्य विनोबा भावे प्रार्थनेच्या सभेंत म्हणाले कीं, मध्यमवर्गीयांचा पगार वाढवून त्यांचें हित होणार नाहीं. त्यापेक्षा त्यांच्या वेतनाचा कांहीं भाग वस्तूंच्या रूपांत व बाकीचा पैशाच्या रूपांत देण्यांत यावा.

**गलिच्छ रस्त्यांबाबत माहितीपट**—भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्यानें मोठ्या शहरांतील गलिच्छ रस्त्यां-संबंधी एक चित्रपट तयार केला आहे. मोठ्या शहरांतील गलिच्छ रस्त्यांचें उच्चाटन करण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत १३ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

**सयाममधील हिंदी व्यापारी**—सयामच्या करविषयक अधिकाऱ्यांनीं कापडाच्या १६ व्यापाऱ्यांना कर चुकविल्याबद्दल अटक केली. त्यांपैकी १४ हिंदी व्यापारी आहेत. सोन्याचा बेकायदा व्यापार करणाऱ्यांविरुद्ध मोहीम चालू केली असतांना त्यांतून कांहीं माहिती मिळाली, त्यावरून कापड व्यापाऱ्यांवर धाड घालण्यांत आली.

**आंधळ्यांची संख्या**—कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील आंधळ्यांच्या संख्येपैकी ७५ टक्के आंधळे भारत, पाकिस्तान व सीलोन ह्या देशांत आहेत. भारत, पाकिस्तान व सीलोनमधील आंधळ्यांची एकूण संख्या सुमारें २३ लाख आहे. कॅनडा, ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड व ब्रिटनमधील आंधळ्यांची संख्या १,४५,००० आहे.

**केरळमधील खादीचा प्रसार**—अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग संघटनेनें केरळ राज्याला १९६०–६१ सालीं ५६ लाख रुपये मंजूर केले आहेत. राज्यांत खादीचा व ग्रामोद्योगांचा प्रसार करण्यासाठी ही रक्कम वापरण्यांत येणार आहे. सहकारी संस्थांमार्फत रकमेचा विनियोग करण्यांत येईल.

**अमेरिकन संशोधकाचें सहकार्य**—आग्रा येथील कॅन्सर-विषयक संशोधनसंस्थेंत काम करण्यासाठी कांहीं अमेरिकन तज्ज्ञ लवकरच भारतांत येणार आहेत. अमेरिकेंतील एका संशोधन-संस्थेकडून आग्रा येथील संस्थेला ३५,००० डॉलर्सची मदत मिळालेली आहे. कॅन्सरच्या रोगाचें निदान लवकर करण्यासाठी उपयुक्त ठरेल, अशा प्रकारचें संशोधन करण्यांत येणार आहे.

**हैद्राबादचें कॉर्पोरेशन**—हैदराबाद व सिकंदराबाद ह्या दोन शहरांसाठी दोन वेगवेगळीं कॉर्पोरेशन्स होतीं. आतां दोन्ही शहरांचें मिळून हैदराबाद कॉर्पोरेशन करणारा कायदा आंध्र प्रदेश विधानसभेनें मंजूर केला आहे. एक कॉर्पोरेशन केल्यामुळें खर्चांत बचत होऊन कार्यक्षमता वाढेल अशी अपेक्षा आहे.

**पाकिस्तानचा तेलाचा शोध**—पाकिस्तानच्या सरकारनें भूमिगत तेलाचा शोध लावण्यासाठी १ कोटी, ४४ लाख रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेपैकी २५ टक्के रक्कम चालू वर्षी खर्च करण्यांत येणार आहे. निरनिराळ्या परदेशी कंपन्यांना २२,२८८ चौरस मैलांत तेलाचा शोध करण्याचे परवाने देण्यांत आले आहेत.

**पादत्राणें तयार करण्याचें शिक्षण**—भारत सरकारच्या व्यापारखात्यातर्फे पादत्राणें तयार करण्याचें शिक्षण देणारी एक संस्था आग्रा येथें स्थापन करण्यांत येणार आहे. संस्था उभारण्या-साठी १० लाख रुपये खर्च येईल. सध्यां ह्याच व्यवसायांत असणाऱ्या ६० लोकांना संस्थेंत एक वर्ष शिक्षण देण्यांत येईल.

**अमेरिकन शास्त्रज्ञांचा इशारा**—अमेरिकेंत न्यू मेक्सिको येथील ओसाड प्रदेशांत १५ वर्षांपूर्वी पहिला अणुबॉंब उडविण्यांत आला. ह्या घटनेच्या स्मरणार्थ अमेरिकेंतील शास्त्रज्ञांच्या फेडरेशननें एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे. येत्या १५ वर्षांत शस्त्रास्त्र-स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्यांत आलें नाहीं तर जगाचा अणुयुद्धानें नाश होईल असा इशारा त्यांनीं दिला आहे.

**कैलासयात्रेचें आकर्षण**—भारताच्या निरनिराळ्या भागांतून निघालेल्या १५ यात्रेकरूंनीं नैनितालहून आपल्या कैलास व मानस सरोवराच्या यात्रेस प्रारंभ केला आहे. ही यात्रा आधींच अवघड समजली जाते. चिनी अधिकाऱ्यांनीं यात्रेकरूंना कोठल्याहि सवलती मिळणार नसल्याचें जाहीर केलें आहे. त्यामुळें ती अधिकच कष्ट-प्रद होण्याचा संभव आहे.

**इटालिअन स्कूटर्सचें उत्पादन**—'व्हेस्पा' ह्या सुप्रसिद्ध स्कूटर्सचें उत्पादन आतां भारतांत होऊं लागलें आहे. ह्या गाड्या आतां बाजारांत आल्या आहेत. प्रत्येक स्कूटरची किंमत २,५००रु. आहे. ती एक गॅलन पेट्रोलमध्यें १२८ मैल जाऊं शकते. तिची जास्तींत जास्त गति तासाला ५३ मैल आहे.

**अमेरिकेचें विमान कां पाडलें?**—बॅरेंटस समुद्रांत रशिआनें अमेरिकेचें एक विमान नुकतेंच पाडलें. ह्या भागांत रशिआ अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्यांचा एक मोठा तळ बांधीत आहे. ह्या तळाची पाहणी टाळण्यासाठी रशिआनें विमान पाडलें असावें असा माहितगारांचा अंदाज आहे.

## सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन

### १९५९-६० मधील उल्लेखनीय प्रगति

सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशननें १९५९-६० मध्यें नवीन गुदामें उघडणें, मालाची उलाढाल करणें आणि धान्य ठेवणाऱ्या शेतकऱ्यांना बँकांकडून कर्जपुरवठा होणें या बाबतींत सर्वांगिण प्रगति केल्याचें सदर संघटनेच्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें.

या कॉर्पोरेशननें सदर वर्षात १७ नवीं मध्यवर्ती गुदामें उघडलीं. सदर वर्षारंभीं ९ गुदामें चालूच होतीं. या निरनिराळ्या गुदामांतून ६० प्रकारच्या जिनसा सांठविण्यांत आल्या. त्यांच्या सांठवण-शक्तींतहि ३,८३,००० मणांवरून वाढ होऊन ती ११,००,००० मणांवर गेली. या गुदामांना १९५८-५९ मध्यें ७६,१९३ रुपये इतकें भाड्याचें उत्पन्न मिळालें होतें. तें सदर वर्षात पांच पटींनीं वाढून ३,८१,१९८ रु. झालें. या संघटनेनें नवीं गुदामें उघडण्यासाठी देशांतील ६८ ठिकाणांची पाहणी केली. तसेंच अमरावती, सांगली, दावणगिरी आणि वरंगळ येथील गुदामांचें बांधकाम जवळजवळ पुरें होत आलें असून त्यांत एकूण २,१२,८०० मण धान्यादि जिनसा सांठवितां येतील. पुनर्विलोकनाच्या वर्षात २१,८४,००० मण सांठवणशक्तीचें आणखी बांधकाम हातीं घेण्यांत आलें. चालू आर्थिक वर्षात १४,००,००० मण सांठवण-शक्तीच्या गुदामांचें बांधकाम चालूं करण्याचा विचार आहे. याशिवाय प्रत्येकी ५६,००० मण सांठवणशक्तीचीं दोन शीत गुदामें बांधण्याचें ठरलें आहे.

गूळ, आलें, मिरी, खोबरें, यासारख्या अनेक जिनसांची खास सांठवण करण्याचीहि केलेली व्यवस्था ही सदर वर्षातील उल्लेखनीय गोष्ट होय. तसेंच सदर वर्षात पद्धतशीर सांठवण, विक्री, बँकिंग, हिशेब व इतर संबंधित विषयांचें शिक्षण २३१ जणांना देण्यांत आलें.

या कॉर्पोरेशनच्या कार्यवाढीच्या प्रमाणांत राज्यांच्याहि गुदाम-कॉर्पोरेशन्सच्या कार्यात वाढ झाल्याचें दिसून येतें. राज्य-कॉर्पोरेशन्सनीं सदर वर्षात एकूण १०६ शहरीं नवीं गुदामें उघडलीं व त्यामुळें त्यांचीं एकूण गुदामें १४८ झालीं.

---

## आर्थिक स्थितीसंबंधीची माहिती

### आगामी शिरगणतीचे विविध तक्ते

सरकारनें चालू केलेल्या किंवा पुढें सुरू करणार असलेल्या विकास कार्यक्रमांचा विचार करतां आगामी शिरगणतीच्या वेळीं माहिती जमा करतांना आर्थिक स्थितिबाबतची माहिती संकलित करण्यावर विशेष भर देण्यांत यावा, असें नुकत्याच भरलेल्या राज्यांच्या आंकडेवारी विभागसंचालकांच्या परिषदेंत ठरविण्यांत आलें. आर्थिक बाबींसंबंधीं पुढील पांच प्रश्न राहतील. (१) शेतकरी म्हणून काम करणारे (२) शेतमजूर म्हणून काम करणारे (३) घरगुती धंद्यामध्यें काम करणारे (४) अन्य काम करणारे आणि (५) काम करीत नसल्यास काय करतात.

क्षेत्रफळासंबंधीं परिषदेनें ठरवलें कीं तें चौरस मैलांबरोबरच चौ. किलोमीटरमध्यें नोंदवून घेतलें जावें. अनुसूचित जाति आणि अनुसूचित जमाति यासाठी योजलेले तक्ते एखाद्या जमाति वा टोळीसंबंधीं न राहतां ते भंगीकाम, झाडूकाम, कातडीं कमावणें यांसारख्या व्यवसायांनुसार लावले जावेत.

शिरगणतीच्या वेळीं गोळा केलेल्या माहितीचा सरकारला शक्य तितक्या चांगल्याप्रकारें उपयोग करून घेतां यावा असा निरनिराळे तक्ते तयार करण्यामागील उद्देश असतो.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्ह्ज् | रु. १,२८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. वा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष
रावसाहेब य. द. खोले
श्री. गो. वा. देवी — श्री. दा. ग. धंडुके

# अर्थ

बुधवार, ता. २७ जुलै, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## कांगोमधील घडामोडींची आर्थिक पार्श्वभूमि

आफ्रिकेंतील कांगो देश नुकताच स्वतंत्र झाला. बेल्जमनें आपल्या ह्या पूर्वीच्या वसाहतीला स्वातंत्र्य दिलें असलें तरी कांगोमधील कटांगा हा प्रांत प्रजासत्ताक कांगोमधून वेगळा होऊं पाहत आहे. ह्या घटनेमागील आर्थिक पार्श्वभूमि समजावून घेण्यासारखी आहे. कटांगा हा प्रांत कांगोमधील सर्वांत श्रीमंत प्रांत आहे. त्यामधील खाणी विशेषत: फार महत्त्वाच्या आहेत. औद्योगिक कामासाठी जे हिरे लागतात त्यांपैकी नऊदशांश हिऱ्यांचा पुरवठा ह्या प्रांतांतील खाणींमधून होतो. अणुयुगापासून महत्त्व पावलेल्या कोबाल्ट ह्या खनिजीच्या जगाच्या पुरवठ्यापैकी ७० टक्के पुरवठाहि कटांगामधून होतो. त्याशिवाय युरेनिअमच्या खनिजाच्या खाणीहि तेथें मोठ्या प्रमाणावर आहेत. शिवाय टिन, शिसें, सोनें, मँगेनीझ, कोळसा, तांबें, ह्यांच्याहि खाणी भरपूर आहेत. कांगो देशाच्या एकूण उत्पन्नापैकी दोनतृतीआंश उत्पन्न कटांगा प्रांताकडून मिळत असतें. हा प्रांत कांगोपासून विभक्त राखण्यांत बेल्जममधील कारखानदारांचें व व्यापाऱ्यांचें हित आहे. बेल्जममधील अर्थव्यवस्था कटांगापासून मिळणाऱ्या संपत्तीवर आधारेलेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. बेल्जममधील १ लाख वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्या कटांगामधून मिळणाऱ्या साधनसंपत्तीवर अवलंबून आहेत. अर्थातच बेल्जममधील व्यापारी व कारखानदार कटांगा प्रांताच्या सरकारवर दडपण आणून त्याला कांगोपासून विभक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## लोकशाही पद्धतीनें आर्थिक नियोजन

इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. जी. एल्. मेहता ह्यांनीं मुंबई येथें बोलतांना आर्थिक नियोजनाविषयीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले, कीं कांहीं लोक खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांचा नष्टांश करावा असें म्हणतात. अशा लोकांना लोकशाही पद्धतीनें विकास पावणाऱ्या अर्थव्यवस्थेची गतिशीलता नीट कळलेली नाहीं असें म्हणावें लागतें. उलटपक्षीं कांहीं जणांना अनिर्बंध पद्धतीनें चालविण्यांत येणारे खाजगी मालकीचे उद्योगधंदे पाहिजे आहेत. ह्या लोकांना सध्यांच्या सामाजिक शक्तींचे आणि अविकसित देशांतील आर्थिक जीवनांत सरकारच्या महत्त्वाच्या स्थानाचें आकलन झालेलें नाहीं. कांहीं लोक नफ्याच्याच विरुद्ध आहेत. पण आर्थिक विकासांत नफ्याच्या हेतूमार्फत उपयुक्त काम करून घेणें शक्य आहे. योग्य ते उपाय योजले तर नफ्याच्या इच्छेकरवीं सार्वजनिक हित साध्य करतां येणें शक्य आहे. कल्याणकारी राज्याची कल्पना आतां सर्वांनींच स्वीकारली पाहिजे. त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं कोणत्याहि प्रकारच्या सामाजिक बदलांत कांहीं प्रमाणांत सरकारचा हात हा असणारच. जे लोक बऱ्या स्थितींत आहेत त्यांच्याकडून थोडाबहुत त्याग हाहि अपेक्षित आहे. लोकशाही पद्धतीचें आर्थिक नियोजन हें चर्चा व वाटाघाटी करून अंमलांत आणावयाचें असतें. कांहीं वेळीं अशा पद्धतीनें निर्णय घेणें अवघड व दिरंगाईचें असतें. पण तरीसुद्धां असे निर्णय हे वरून लादण्यांत आलेल्या निर्णयापेक्षा अधिक चांगले ठरतात.

## म्हैसूर राज्यांतील कागदाचें उत्पादन

म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्री श्री. जत्ती ह्यांनीं कर्नाटक पेपर मिल्स लि. ह्या नव्या कारखान्याच्या मुख्य कचेरीचें बंगलोर येथें उद्घाटन केलें. हा कारखाना नव्यानें काढण्यांत येत असून त्यामधील उत्पादनास पुढील वर्षी प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना मुख्य मंत्र्यांनीं राज्यांतील कागदाच्या धंद्याचा आढावा घेतला. ते म्हणाले, कीं सध्यां म्हैसूर राज्यांतील औद्योगिक हालचालींना नवा वेग आलेला आहे. अशा परिस्थितींत स्पर्धा टाळण्यासाठी नव्या प्रकारचे उद्योगधंदे काढणें अगत्याचें आहे. म्हैसूर राज्यांतील कागदाचा धंदा वाढत चाललेला आहे. म्हैसूर पेपर मिल्स ह्या कारखान्याचें सध्यांचें उत्पादन रोज २० ते ३० टनांपर्यंत आहे. उत्पादन दुप्पट करण्याची योजना कारखान्यातर्फे आंखण्यांत आली आहे. दांडेली येथील वेस्टकोस्ट पेपर मिल्स हा कारखानाहि उत्पादन दुप्पट करण्याच्या खटपटींत आहे. मंड्या नॅशनल पेपर मिल्स ह्या कारखान्यांत उसाच्या चिपाडांपासून कागद तयार करण्यांत येतो. ह्या कारखान्याचाहि विस्तार करण्यांत येणार आहे. अशाच पद्धतीचे आणखी दोन कारखाने काढण्यांत येण्याची शक्यता आहे. पैकी उगार येथें व दुसरा होसपेट जवळ काढण्यांत येईल. जुन्या कारखान्यांचा विस्तार आणि नव्यांची उभारणी ह्यांच्या योगानें म्हैसूर राज्यांतील कागदाचें उत्पादन सध्यांच्या निदान तिप्पट होईल अशी अपेक्षा आहे. म्हैसूर राज्यांतील बांबूच्या संभाव्य पुरवठ्यासंबंधीं पाहणी करण्यासाठी एका कमिटीची नेमणूक करण्यांत आली आहे.

## १९५९-६० मध्यें भारताच्या निर्यातीचा उच्चांक

भारतानें १९५९-६० मध्यें एकूण ६४१ कोटी रु. किंमतीच्या मालाची निर्यात करून या बाबतींत एक विक्रम प्रस्थापित केला आहे. हा आंकडा १९५८-५९ पेक्षा १५ टक्क्यांनीं जास्त आहे. तागाचा माल, सुती कापड, कातडी वस्तू, यांसारख्या नेहमींच्या वस्तूंच्या निर्यातीबरोबरच या वर्षांत भारतीय इंजिनिअरिंग धंदेक्षेत्रांत तयार झालेल्या वस्तूंचीहि प्रथमत:च निर्यात झाली.

या वर्षांत ८४ कोटी वारांहून अधिक गिरणीकापडाची निर्यात झाली. गतवर्षीपेक्षा हा आंकडा जवळ जवळ ५० टक्क्यांनीं जास्त आहे. त्याचप्रमाणें हातमागी कापडाच्या निर्यातींतहि वाढ झाल्यानें या वर्षांत सुती कापडाच्या निर्यातीपासून गतवर्षीपेक्षा १७ कोटी रु. जास्त उत्पन्न आलें. त्याचप्रमाणें तागाच्या मालाच्या निर्यातीपासूनहि १० कोटी रु. जादा उत्पन्न आलें. चहाच्या निर्यातींत मात्र किंचित् घट झाली. (२० लाख रत्तल). या वर्षी प्रथमत:च भारतीय सायकलींची मोठ्या संख्येंत (११ लाख रु. किंमतीच्या) निर्यात झाली. शिवण्याच्या यंत्रांची तर आतां अमेरिकेसारख्या औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशाकडेहि निर्यात होत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत एकूण ३४५० कोटी रु. किंमतीच्या माळाची निर्यात करण्याचें ठरलें आहे.

## गीतेंत सांगितलेले तीन प्रकारचे कर्ते

### रिझर्व्ह बँकेचे श्री. अंबेगांवकर ह्यांचं बँक नोकरांना उद्देशून विवरण

रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर, श्री. के. जी. अंबेगांवकर हे गीतेचे अभ्यासक आहेत; संस्कृतचे गाढे पंडित आहेत. त्यांनीं बँक नोकरांना उद्देशून गीतेंतील तीन श्लोकांचें विवरण केलें आहे. गीतेमधील १८ व्या अध्यायांतील २६, २७ व २८ ह्या श्लोकांत सात्त्विक, राजस व तामस कर्त्यांचें वर्णन केलेलें आहे. ते श्लोक असे:—

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥
रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥
अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥

(२६) ज्याला आसक्ति नाहीं, जो मी व माझें म्हणत नाहीं, कार्य सिद्ध होवो न होवो (दोन्हीं वेळीं) जो (मनानें) अविकृत, (तथापि) जो धृति व उत्साह यांनीं युक्त होत्साता कर्म करितो, त्यास सात्त्विक (कर्ता) म्हटलें आहे. (२७) विषयासक्त, लोभी (सिद्धि व असिद्धि यांचे ठायीं यथानुक्रम), हर्ष व शोक यांनीं युक्त, कर्मफलाच्या प्राप्तीची इच्छा धरणारा, हिंसात्मक आणि अशुचि, अशा कर्त्यास राजस म्हणतात. (२८) अयुक्त म्हणजे चंचल बुद्धीचा, अडाणी, ताठलेला, ठक, नैष्कृतिक म्हणजे बुडव्या, आळशी, सदा रडट्टू व दीर्घसूत्री म्हणजे चेंगट किंवा घटकेच्या ठिकाणीं महिना लावणारा, अशा कर्त्यास तामस म्हटलें आहे. (लो. टिळक—गीतारहस्य).

आपल्यापैकी फारच थोड्यांना पूर्णपणें सात्त्विक रीतीनें काम करणें जमेल. पण आपण जरी धार्मिक वृत्तीचें नसलों, तरी चांगल्या वर्तनाचे नियम आपण पाळायला काय हरकत आहे? आपल्या पंतप्रधानांचे प्रमाणें, धार्मिक गोष्टींची आवड नसणारेसुद्धां सदाचारावर भर देतातच; ह्या सदाचाराचे द्वारां ईशप्राप्ति होईल, असें गीतेंत सांगितलेलें आहे. म्हणून, धर्म न मानणारांनींसुद्धां गीतेंत सांगितलेल्या सात्त्विक आचारांचें नियम पाळायला हवेत. आपण राजसपणावरच संतुष्ट असलों, तरी एक वेळ चालेल, पण तामस तर कधींच बनता कामा नये.

कोणताहि मनुष्य पूर्णपणें सात्त्विक, पूर्णपणें राजस किंवा पूर्णपणें तामस असत नाहीं; एकाच मनुष्याचे ठिकाणीं तिन्हींचें कमी-अधिक प्रमाणांत अस्तित्व आढळतें; त्यांपैकी कोणत्यांचें प्राबल्य आहे, त्यावरून मनुष्याचें चारित्र्य कळून येतें. पूर्णपणें सात्त्विक कार्य करणारे आपण होऊं शकलों नाहीं, तरी शक्य तितके सात्त्विकपणाचे नियम आपण आचरणांत आणण्याचा प्रयत्न करूं शकतों आणि शक्य तेवढा तामसीपणा टाळूं शकतो.

सात्त्विकपणांत मुक्तसंग (आसक्ति नाहीं), अनहंवादी (मी-पणा नसणें) धृति-उत्साह समन्वितः (निश्चय आणि उत्साह दोन्ही असणें), सिद्धि-असिद्ध्योः निर्विकारः (यश किंवा अपयश ह्यांनीं मनावर परिणाम न होऊं देणें) ह्यांचा समावेश होतो.

तामसी मनुष्य रागी (विषयासक्त), कर्मफलप्रेप्सु (कृतीच्या फलप्राप्तीची वाट पहाणारा), लुब्ध (लोभी), विध्वंसक (बिघाड करणारा), अशुचिः (अस्वच्छ) आणि हर्षशोकान्वितः (विजयानें चढणारा आणि पराजयानें हतबल होणारा), असा असतो.

तामसी मनुष्य अयुक्त (कामांत लक्ष न घालणारा), प्राकृत (अडाणी), स्तब्ध (ताठर), शठ (लबाड, फसव्या), नैष्कृतिक (हातचलाखी करणारा), अलस (मंदगतीनें काम करणारा), विषादी (कडवट), आणि दीर्घसूत्री (वेळ काढणारा) असा असतो.

गीतेंतील श्लोकांचा वरील अर्थ लावतांना, श्री. अंबेगांवकर ह्यांनीं आपल्यापुढें बँक नोकरांची वागणूक ठेवलेली आहे. सात्त्विक वृत्ति अतिशय अवघड आहे, हें खरें असलें तरी त्या वृत्तीची आवश्यकताच नाहीं, असें म्हणणें चूक आहे. जितक्या जास्त प्रमाणांत आपल्यामध्यें सात्त्विकपणा आणतां येईल, जितक्या अधिक प्रमाणांत आपणांस मानसिक शांति लाभेल आणि कोणत्याहि कामास आवश्यक असलेला उत्साह आणि धृति प्राप्त होईल.

राजस वृत्तींपैकी लोभ, अशुचि आणि विध्वंसक वृत्ति, हीं केव्हांहि त्याज्यच होत; आपल्या वागणुकींत तीं आढळलीं, तर त्यांतून आपण मुक्त होण्याचा प्रयत्न करायला हवा.

तामस वृत्तीबद्दल बोलायलाच नको. पण, आपल्यांत तामसी वृत्ति नाहीं, असा आपण समज मात्र करून घेतो. अयुक्तता (कामांत लक्ष केंद्रित नसतें), अलस (आळस), विषाद (कडवटपणा) आणि दीर्घसूत्रता (मुद्दाम विलंब लावणें) हे दोष आज बँकांच्या नोकरांत मोठ्या प्रमाणावर आढळतात. गिऱ्हाइकांशीं वागताना, स्तब्ध (ताठरपणा), शठ (सचोटीचा अभाव) आणि नैष्कृतिक (लोकांना फसविणें) हीं टाळायला हवींत.

गीतेनें सांगितलेले हे हितकारक नियम दैनंदिन कामाचे वेळीं अमलांत आणणें आवश्यक आहे. सात्त्विक कर्माचे उच्च पातळीला पोंचण्याचा प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. तामसपणाचीं आठ लक्षणें तर पूर्णपणें टाळलीं पाहिजेत. म्हणजे आपलें आयुष्य यशस्वी होईल व ज्या संस्थेंत आपण काम करतों, तिच्याहि यशास हातभार लागेल.

---

## ट्रॉम्बे येथील खताच्या कारखान्याला मदत

मुंबईजवळ ट्रॉम्बे येथें रासायनिक खताचा सार्वजनिक मालकीचा एक कारखाना भारत सरकार काढणार आहे. त्या कारखान्याच्या उभारणीसाठी अमेरिकन सरकारच्या डेव्हलपमेंट लोन फंडामधून २ ते ३ कोटी डॉलर्सची मदत मिळण्याचा संभव आहे. ह्यासंबंधीची अधिकृत घोषणा लवकरच करण्यांत येईल. अमेरिकन सरकारकडून मिळणाऱ्या ह्या मदतीला विशेष अर्थ आहे. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांशीं स्पर्धा करूं शकणाऱ्या अशा सार्वजनिक मालकीच्या विभागांतील योजनेला मदत देण्याचा अमेरिकेचा हा पहिलाच प्रसंग होईल. आशिआंतील देशांना मदत देतांना, ज्या औद्योगिक कारखान्यांमुळें खाजगी मालकीच्या कारखान्यांना स्पर्धेला तोंड द्यावें लागेल अशा कारखान्यांना मदत न देण्याचें अमेरिकेचें धोरण असतें. परंतु भारताच्या बाबतींत अपवाद करण्यांत आलेला आहे. रासायनिक खताचे मोठे कारखाने काढण्यासाठी भांडवल खूप लागतें. भारतांत अशा कारखान्यांसाठी पुरेसें भांडवल पुढें येत नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी मालकीचें खताचे कारखाने काढण्यास सरकारनें वाव ठेवलेला आहे. परंतु आतांपर्यंत फक्त छोट्या कारखान्यांकडूनच विचारणा आल्या आहेत. तथापि खाजगी मालकीच्या खताच्या मोठ्या कारखान्यांना अमेरिकन सरकारकडून मदत मिळणार नाहीं असें नाहीं. भारतामधील खाजगी मालकीच्या धान्याच्या उत्पादनाचा फोर्ड फौंडेशननें अभ्यास केला व रासायनिक खताचें उत्पादन वाढविलें तरच धान्याचें उत्पादन वाढूं शकेल असा अभिप्राय व्यक्त केलेला आहे.

### कंदिलांचें उत्पादन व निर्गत

हातकंदिलाच्या उत्पादनावर कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें प्रतिकूल परिणाम होत आहे. १९५५ मध्यें ५५ लक्ष कंदिलांचें उत्पादन झालें होतें; १९५६ मध्यें तें कायम राहिलें. पण, १९५७ पासून मात्र मागणीचे मानानें उत्पादन अपुरें पडत आहे. १९५६ पर्यंत, १२ कारखान्यांतून उत्पादन होत असे; आतां त्यांपैकी ४ कारखाने बंद पडले आहेत. कंदिलांना लागणारा कच्चा माल म्हणजे टिनप्लेट, ब्लॅक शीट आणि पोलादी तार. दरसाल ६,००० टन टिनप्लेटची मागणी आहे, पण तें उत्पादन करणारा भारतांत एकच कारखाना आहे. आयातीवर बंधनें आहेत. टिनप्लेटवरील एक्साइज ड्यूटी वाढविल्यामुळें त्याची किंमत आयात होणाऱ्या टिनप्लेटपेक्षा खूपच जास्त झाली आहे. पोलादी तारेचाहि तुटवडा भासत आहे. पूर्व आफ्रिका, मलाया, सिलोन, बर्मा, इराणच्या आखाताजवळील देश, ह्यांकडे हिंदी कंदिलांची निर्गत होते; पण १९५८ पासून निर्गत कमी होऊं लागली आहे.

### इजिप्शनांबद्दल रशियनांचें मत

इजिप्तमधील आस्वान धरणावर काम करणाऱ्या रशियन तज्ज्ञांना तेथील इजिप्शन कामगारांबरोबर वागणें अवघड जात आहे, अशी 'इझवेस्ता'ची बातमी आहे. रशियनांनीं इजिप्शन कामगारांसाठी बांधकामाच्या शिक्षणाकरितां वर्ग सुरू केले, ते इजिप्शन कामगारांना नको आहेत. काम संपतांच, आपलीं हत्यारें अस्ताव्यस्त टाकून बस पकडण्यासाठीं धावणाऱ्या इजिप्शन कामगारांची वृत्ति रशियन लोकांना चमत्कारिक वाटली. कसून काम करण्याची आवश्यकता इजिप्शन लोकांना पटत नाहीं. रशियन व इजिप्शन लोकांसाठी वसाहत बांधण्याचें काम पत्करणारा इजिप्शन कंत्राटदार कुवेत येथें ज्यास्त पैसे मिळण्याची संधि दिसतांच, काम टाकून पळून गेला. नवा कंत्राटदार मिळेपर्यंत बांधकाम स्थगित झालें आहे.

### "प्रत्येकजण कमी-जास्त प्रमाणांत दरोडेखोर आहे"

आचार्य विनोबा भावे आतां फक्त दह्यावरच रहातात; सहा महिन्यांपूर्वीच त्यांनीं इतर अन्न सोडून दिलें आहे. "मी स्वत: एक दरोडेखोरच आहे, कारण मी दररोज दोन शेर दही खातों. त्याला जेवढें दूध लागतें, तेवढें दूध २० माणसांच्या रोजच्या आहारांत येत नसेल. प्रत्येकजण कमी-अधिक प्रमाणांत अशा रीतीनें दरोडेखोर असतो. प्रत्येकाला तें माहीत असतें." असें आचार्यांनीं इंदूर येथील आपल्या एका भाषणांत सांगितलें.

### पैसेवाल्या भिक्षेकऱ्याला शिक्षा

मुंबईच्या एका मॅजिस्ट्रेटनें हाजी सुभेदार नांवाच्या भिक्षेकऱ्याला अब्दुल रहिमान स्ट्रीटवरती भिक्षा मागितल्याबद्दल एक वर्षभर बेगर्स होममध्यें ठेवण्यांत यावें, असा हुकूम केला, तेव्हां आपल्याला पकडण्यांत आले त्यावेळीं पोलिसांना सांपडलेले १,२०० रु. आपणांस हाजची यात्रा करण्यासाठी परत मिळावेत अशी त्यानें मॅजिस्ट्रेटला विनंती केली. यात्रेसाठी मी पैसे जमवीत होतों; भिक्षा मागीत नव्हतो; असें त्याचें म्हणणें होतें.

### एस. टी. चा व्याप

पूर्वीच्या, अविभक्त मुंबई राज्यांत १९५८-५९ मध्यें बॉम्बे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशननें १०,९४३ मैल लांबीच्या ३३६ नव्या मार्गांवर, बसेस सुरू केल्या. वर्षअखेर, ६५,४२४ मैल लांबीच्या २,११४ मार्गांवर बसेस चालू होत्या.

### बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्सचें उद्‌घाटन

बँका, पोस्ट ऑफिसांचें सेव्हिंग्ज बँक खातें, सरकारी ट्रेझऱ्या, इत्यादींत कामें करणाऱ्यांना शिक्षण देऊन त्यांची पात्रता वाढविण्यासाठीं व त्यांत प्रवेश मिळवूं इच्छिणाऱ्यांसाठी डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, पुणें, ह्या संस्थेनें बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्सची योजना केली आहे. त्याची मुदत तीन महिने असून वेळ सायंकाळी ७ ते ८ अशी आहे. संबंध कोर्सची फी २५ रु. ठेवण्यांत आली आहे. कोर्स संपल्यावर परीक्षा घेण्यांत येणार नाहीं, पण कोर्स योग्य रीतीनें पुरा करणारांना सर्टिफिकेट दिलें जाईल. रिझर्व्ह बँकेच्या बँकर्स ट्रेनिंग कॉलेजच्या धर्तीवर अभ्यासक्रमाची आखणी करण्यांत आली आहे; आणि तात्त्विक ज्ञानापेक्षा व्यावहारिक बाजूवर भर दिला जाईल. अनुभवी तज्ज्ञांचीं व्याख्यानें, बँका व सहकारी सोसायट्या ह्यांना भेटी, इत्यादींचीहि व्यवस्था केली जाईल. ह्या उपक्रमाची उपयुक्तता निर्विवाद आहे आणि त्यामुळें बँकांचे व्यवहार अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल. बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे मॅनेजर श्री. चिं. वि. जोग ह्यांच्या हस्तें दि. १ ऑगस्ट रोजीं कोर्सचें उद्‌घाटन होईल.

### धुळें येथें शेतकी कॉलेज

धुळें येथील शेतकी कॉलेज आतां सुरू झालें आहे. महाराष्ट्रांतील हें पांचवें शेतकी कॉलेज आहे; बाकीचीं पुणें, नागपूर, अकोला आणि परभणी येथें आहेत. सर्व कॉलेजांत मिळून ६२० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे.

### सहकारी संस्थांमधील अफरातफर

१९५६ पासून आतांपर्यंत, पुणें, नागपूर व मराठवाडा विभागांत मिळून १०७ अफरातफरीचे प्रकार सहकारी सोसायटयांत उघडकीस आले; त्यांत २,२३,९६० रु. ची अफरातफर दिसून आली.

**मध्यप्रदेशांतील प्रेक्षणीय स्थळें**—जबलपूर जिल्ह्यांतील ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळांची सुधारणा करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें २ लाख रुपये मंजूर केले आहेत. अशा इमारतींची डुरुस्ती नीटशी न ठेवल्यामुळें त्या हळुहळु मोडकळीस येत चालल्या होत्या. आतां त्यांच्या देखरेखीचें व दुरुस्तीचें काम ताबडतोब सुरू होईल.

**गुजरात स्टेट ट्रॅन्सपोर्ट**—गुजरात स्टेट ट्रन्सपोर्ट कॉर्पोरेशन ५०० नव्या मोटारगाड्या घेणार आहे. त्यासाठी कॉर्पोरेशनला २॥ कोटी रुपये द्यावे लागतील. सामानाच्या चोऱ्या व चोरटा प्रवास ह्यामुळें कॉर्पोरेशनला दरसाल ७॥ लाख रुपयांचें नुकसान होत आहे, असा अधिकृत अंदाज आहे.

**घड्याळाचा कारखाना**—हिंदुस्थान मशीन टूल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर हे जपानच्या दौऱ्यावर गेले आहेत. दौरा चार आठवड्यांचा आहे. मशीन टूल्स कारखान्याला जोडून काढावयाच्या घड्याळाच्या कारखान्याची अंतिम योजना ते तयार करणार आहेत. कारखाना एका जपानी कंपनीच्या साह्यानें काढण्यांत यावयाचा आहे.

**जमिनीची धूप थांबविण्याची योजना**—हिमाचल प्रदेशांतील जमिनीची धूप थांबविण्यासाठी २॥ कोटी रुपये खर्च येणारी एक योजना आंखण्यांत आली आहे. उत्तर हिंदुस्थानांतील पांच नद्यांना येणारें पाणी मुख्यत: ह्या प्रदेशांत होणाऱ्या पावसामुळें येतें.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४

**सन १९५९–६० मध्यें नव्या कंपन्यांच्या नोंदणीचा उच्चांक**

सन १९५९–६० मध्यें कंपन्यांच्या संख्येंत आणखी १४५२ कंपन्यांची भर पडली असें उपलब्ध आंकडेवारीवरून दिसून येतें. १९५८–५९ मध्यें १,०९५ नव्या कंपन्या स्थापन झाल्या होत्या. सन १९५९–६० मधील हा आंकडा त्यापूर्वीच्या गेल्या आठ वर्षांतल्या पेक्षा सर्वांत अधिक आहे. कंपनी कायद्याच्या विविध तरतुदींचें महत्त्व आतां जनतेला अधिकाधिक प्रमाणांत समजून येत आहे हाच या वाढीचा अर्थ असून कंपन्या रजिस्टर करण्याच्या प्रमाणांतहि त्यामुळें सतत वाढ होईल.

सन १९५९–६० मध्यें रजिस्टर करण्यांत आलेल्या कंपन्यांपैकीं १,३६५ कंपन्या प्रायव्हेट व ८७ पब्लिक कंपन्या होत्या आणि त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें ९३·४० कोटी रु. व ६७·१४ कोटी रु. होतें. या नव्या कंपन्यांपैकीं सर्वांत अधिक म्हणजे ३९९ प. बंगाल राज्यांत स्थापन झाल्या. मुंबई राज्यांत २९३ नव्या कंपन्यांची नोंद करण्यांत आली.

दि. ३१ मार्च, १९६० रोजीं भारतांत एकूण २६,२२१ कंपन्यांचें कामकाज चालू असावें व त्यांचें विक्री झालेलें भांडवल १,५९३ कोटी रुपयांपर्यंत भरावें असा अंदाज आहे. यांपैकीं पब्लिक लि. कंपन्यांची संख्या ७,३०६ व विक्री झालेलें भांडवल ८१२ कोटी रु. आणि प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची संख्या १९,६१५ व विक्री झालेलें भांडवल ७८१ कोटी रु. असावें असा अंदाज आहे.

**उसाच्या पिकाचा १९५९–६० चा अंतिम अंदाज**

भारतांत १९५९–६० मध्यें ५१,७८,००० एकर जमिनींत उंसाच्या पिकाची लागवड झाली असावी व त्यामुळें ७,५०,३८,००० टन ऊंस तयार होईल असा मध्यवर्ती अन्न व शेतकी खात्यांतील अर्थ व आंकडेवारी विभागाचा या पिकाबाबतचा अंतिम अंदाज असून या दोन्ही बाबतींत उच्चांक प्रस्थापित होत आहे. १९५८–५९ मधील हाच अंशतः दुरुस्त अंदाज अनुक्रमें ४८,०३,००० एकर आणि ७,०४,५६,००० टन ऊंस असा होता. म्हणजे १९५९–६० मध्यें लागवडीच्या क्षेत्रांत ७·८ टक्क्यांनीं आणि उत्पादनांत ६·५ टक्क्यांनीं वाढ झाली. लागवडीच्या क्षेत्रांतील व उत्पादनांतील ही वाढ मुख्यत्वें महाराष्ट्र, पंजाब, उत्तर प्रदेश व बिहार या राज्यांत झाली.

**प्रमुख २५ हिंदी शेड्यूल्ड बँकांचें उत्पन्न व खर्च**
( आकडे कोटी रुपयांचे )

| | १९५७ | १९५८ | १९५९ |
|---|---|---|---|
| १. ठोक उत्पन्न | ५१·८ | ६२·१ | ६९·९ |
| व्याज व डिस्कौंट | ३९·८ | ४९·६ | ५६·० |
| इतर उत्पन्न | १२·० | १२·५ | १३·९ |
| २. एकूण खर्च | ४३·४ | ५४·५ | ६२·० |
| दिलेलें व्याज | १९·८ | २६·३ | ३१·१ |
| नोकरांवरील खर्च | १७·६ | २०·५ | २३·३ |
| इतर खर्च | ६·० | ७·७ | ७·६ |
| ३. निव्वळ नफा | ८·४ | ७·६ | ७·९ |

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

**बेळगांव**

( शेड्यूल्ड बँक )
स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठीं नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
**१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल, ३ तुमचें स्थान कोणतें ?**



आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनांच द्यावें लागेल, सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यांवरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांनीं ब्राम्ही वनस्पती-युक्त तेल करण्याची कल्पना सुचली, औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

महत्त्वाचें पान

१८९९–१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायव्हेट लि. हीरक महोत्सव

**रशिअन हेलिकॉप्टर्सची चांचणी**—रशिआनें भारताला खूप उंचीवर जाणारी हेलिकॉप्टर्स विमानें भारतांत उत्पादन करण्यासाठी मदत देऊं केली आहे. सध्यां ह्या विमानांची चांचणी सुरू आहे. चीनच्या उत्तरेकडील आक्रमणाच्या संदर्भात त्यांना विशेष महत्त्व आहे. एका विमानांत ४० लष्करी शिपाई आपल्या सामानासह जाऊं शकतात.

**पदवीधरांची रोजगारविषयक पाहणी**—भारतामधील पदवीधरांच्या रोजगारीची परिस्थिति अजमावण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक पाहणी करण्याचें ठरविलें आहे. पाहणीसाठी माहिती गोळा करण्याचें काम एका प्रश्नावलीच्या द्वारें करण्यांत येत आहे. पदवीधरांचा रोजगार, त्यांचें उत्पन्न, इत्यादि बाबींविषयींची प्रश्न-पत्रिका भारतभर २२,००० पदवीधरांकडे पाठविण्यांत आली आहे.

**कांडला भागाचा विकास**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कांडला बंदराच्या विभागांत सार्वजनिक मालकीचा एक तरी मोठा उद्योगधंदा काढण्यांत यावा, अशी विनंती गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सनें मध्यवर्ती सरकारला केली आहे. कांडलाच्या औद्योगिक विकासास त्यामुळें चांगली चालना मिळेल असें चेंबरचें म्हणणें आहे.

**जंगली हत्तींना पकडण्याची मोहीम**—म्हैसूरजवळच्या जंगलांतील रानटी हत्तींना पकडण्याची मोहीम मधून मधून काढण्याची प्रथा आहे. पण आतां ती बंद पडण्याची शक्यता आहे. कारण, रानटी हत्तींच्या वसतिस्थानाची जागा एका धरणा-खालीं बुडण्याचा संभव आहे. शिवाय हत्तींना मागणीहि कमी येत आहे. अशा मोहिमेला 'खेडा' म्हणतात. एका मोहिमेला २ लाख रुपये खर्च येतो.

**आसाममधील दंगलीचा परिणाम**—आसाममध्यें नुकत्याच झालेल्या भाषिक दंगलीमुळें चहाच्या मळ्यांवर वाईट परिणाम झाला आहे. आसाममध्यें १,०० चहाचे मळे असून त्यांवरील बहुतेक कामगार बिगर-आसामी आहेत. फक्त १५ ते २० टक्के कामगार आसामी आहेत. बिगर-आसामी कामगार व मळ्यांचे मालक ह्यांच्यावर अनेक ठिकाणीं हल्ले करण्यांत आले.

**प्राप्तीवरील कर आकारा**—काँग्रेसचे एक माजी अध्यक्ष श्री. पुरुषोत्तमदास तंडन ह्यांनीं प्राप्तिकर खात्याकडे आपणाकडून गेल्या ७ वर्षांचा प्राप्तिकर घ्यावा अशी विनंती केली आहे. खात्यानें ८ वर्षांसाठी १,४०० रुपयांची आकारणी केली होती. परंतु नंतर त्यांच्याच सुचनेवरून पुन्हा आकारणी केली असतां त्यांनीं आणखी ३,००० रुपये भरले. सध्यां ते बरेच आजारी आहेत.

**शाळकरी मुलांना गणवेष**—रेल्वेतर्फे चालविण्यांत येणाऱ्या प्राथमिक शाळांतून ४०,००० मुलें शिकत असतात. ह्या मुलांना रेल्वेखात्यातर्फे लवकरच गणवेष पुरविले जाणार आहेत. ज्या कामगारांना दरमहा २०० रुपयांपेक्षा कमी पगार असेल त्यांच्या मुलांना मोफत व बाकीच्या मुलांना खरेदीच्या किंमतीला गणवेष दिला जाईल.


**THE DECCAN INSTITUTE OF COMMERCE.**

*717, Budhwar Peth, Poona 2.* *Phone No. 2360*

**BANKERS PRACTICAL TRAINING COURSE.**

Admission to Bank-employees and Persons desirous of taking up Banking Career.

Duration—3 months. Time—7 to 8 p.m. Fees — Rs. 35 only. Limited admission.

( Date of Commencement :— 1st August, 1960. )

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बँक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )

मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.


★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—बी. वाय्. पाठक, जॅ. मॅनेजर.

# STURDY STABILITY

*Elegence* *Precision*




Great pyramids and sphynx in Egypt are a puzzle to the modern world. They possess incredible intricacy of sturdiness and craftsmanship. They stand centuries together undamaged—Really a wonderful example for sturdiness. As well it is miracleously intricated with craftsmanship. Very few are the examples of such type where sturdiness & elegance go hand in hand.

Similarly in machinery world of today, sturdiness and precision workmanship is well needed. A slightest mistake in designing and workmanship means- an immeasurable loss of money, time and work.

***We stand for ....***

- Cams & keys of various types.
- Plastic & Rubber plantation equipment, Extruders, Spreading machines & mixing mills.
- Chemical Engineering equipment, Auto-cloves, pressure-pans, Kiers etc.
- Calenders, Beaters and presses of various types
- Die-punches & moulds.

**For success**



## THE SOUTHERN MACHINE INDUSTRIES
GULTEKDI ROAD, SWARGATE POONA 2.

Phone : 6640

Gram : 'SOUMACHINE'

Proprietor . SUPANEKAR BROS.



## कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : —श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## 'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार

२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक

३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.